स्थायी समितीच्या गुरुवार दिनांक 21–06–2012 रोजी दुपारी 12–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 4. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 5. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 6. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 7. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 8. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 9. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 10. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 11. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 12. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 13. | सौ. अल्का अजय दलाल | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 2. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 3. | सौ. जैस्वाल हर्षला संजय | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. रविन्द्र कुंभारे, अति. उपायुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 64 :– नागपूर महानगरपालिका मध्ये कार्यरत असलेले मा. पदाधिकारी व अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामाकरिता चार चाकी वाहणे पुढील दोन वर्षाकरिता भाडेतत्वावर घेवून देण्यास्तव नविन दर करार करण्याकरिता मनपा तर्फे नविन निविदा सुचना ची जाहिरात स्थानिक वर्तमान पत्रात व online वर देऊन ई– निविदा बोलविण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 65 :– स्था.स.ठराव क्र.219 दि.23.12.2011 चे अनुषंगाने मे.एन.एम.एंटरप्रायजेस, पद्मुगल, कक्कानाड, एरनाकुलम यांना '' नागपूर शहरातील 17599 पथदिवे (250 वॅट व 150 वॅट सो. व्हे.) इंडक्शन लॅप पथदिव्यांनी ' बांधा, वापरा व हस्तांतरित करा '' या तत्वावर बदलणे व 17599 पथदिव्यांच्या यंत्रणेतील नादुरुस्त केबल्स, खांब बदलणे स्विच गियर बॉक्सेस बदलणे/अपग्रेड करणे व या संपूर्ण पथदिव्यांची कंत्राटाच्या कालावधीत देखभाल– दुरुस्ती करणे व अस्तित्वात असलेल्या पथदिव्यांच्या साहित्यातून (शक्यतो) हायमास्ट वरील पथदिव्यांची देखभाल – दुरुस्ती करणे'' या करारनामा करुन देण्यात आलेल्या कंत्राटाचे अनुषंगाने व निविदा अटी शर्तीनुसार करावयाची विविध कामे जसे ––

- कंत्राटात अंर्तभूत सोडीयम व्हेपर पथदिवे इंडक्शन लॅप पथदिव्यांनी बदलणे (हे सर्व पथदिवे बदलण्यापोटी येणाऱ्या खर्चाची प्रतीपुर्ती हे दिवे लावून निविदा अटीशर्तीनुसार वापरुन जी विजेची बचत अपेक्षीत होती त्यातून करणे कंत्राटाच्या अटी शतीनुसार अभिप्रेत आहे.)
- नादुरुस्त केबल्स, खांब , स्विच गियर बॉक्सेस बदलणे/अपग्रेड करणे ( या कामाचे भुगतान काम पूर्ण झाल्यानंतर (फिडरवाईज) कंत्राटदारास मंजूर निविदा दरानुसार कामाच्या रकमेचे 60 समान मासीक हप्त्यांमध्ये (60 ई.एम.आय.नुसार) भुगतान करणे अभिप्रेत आहे.
- अस्तित्वात असलेल्या पथदिव्यांची कंत्राट दिल्यानंतर देखभाल– दुरुस्ती करणे व याकरीता आवश्यक लॅडर, व्हेईकल्स/हायड्रॉलीक लॅडर व्हेईकल्स खरेदी करुन या कामास्तव उपलब्ध करुन हे देखभाल दुरुस्तीचे काम करणे.

हि सर्व कामे निविदा अटी शर्तीनुसार न केल्याने/कामांना निविदा अर्टी शर्तीनुसार सुरु करावयाच्या वेळेत ही कामे सुरु देखील न करणे या कारणामुळे कंत्राटदारास प्रथम या कंत्राटाच्या अनुषंगाने काय कार्यवाही केलेली आहे याची माहिती सादर करण्यास देण्यात आलेल्या दि.31.03.2012 च्या पत्रास कंत्राटदाराने प्रतीसाद न दिल्याने दि. 16.4.2012 च्या पत्रान्वये कंत्राटदारास ''कंत्राट रद्द का करु नये?'' या

आशयाची कारणे दाखवा नोटीस दिल्यानंतर या कारणे दाखवा नोटीस ला कंत्राटदाराने दि. 15.05.2012 च्या पत्रान्वये दिलेले स्पष्टीकरण समाधानकारक नसल्याने हे स्पष्टीकरण अमान्य करुन व कंत्राटदाराने निविदा अटी– शर्तीचा भंग केलेला आहे ही बाब लक्षात घेता ––

1) मे. एन.एम.एंटरप्रायजेय, पद्मुगल, कक्कानाड, एरनाकुलम यांना देण्यात आलेले वर नमुद कामाबाबत स्थायी समिती ठराव क्र.219 दि.23.12.2011 चे अनुषंगाने करण्यात आलेल्या करारनामा रद्द करुन व त्यांची सुरक्षा ठेवीमध्ये रुपांतर झालेली अनामत रक्कम जप्त करुन हे कंत्राट रद्द करण्यास मंजूरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन कंत्राट रद्द करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली. तसेच

2) हे कंत्राट रद्य करुन या कामाकरिता फेरनिविदा बोलवून नविन कंत्राटदाराची नियुक्ती होईपर्यंतच्या कालावधीमध्ये सध्या 10 झोन्समधे ज्या कंत्राटदारांस या 17599 पथदिवे व हायमास्टस् वरील पथदिवे वगळता इतर पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीचे जे कंत्राट दिलेले आहे त्या कंत्राटदारांकडून मंजूर निविदा दरानुसार या रद्द करण्यात येणाऱ्या कंत्राटामधे अंतर्भूत पथदिव्यांची देखभाल–दुरुस्ती करवून घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन देखभाल व दुरुस्ती करण्यास एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येते. तसेच या देखभालीच्या खर्चास कार्यालयाने सुचविल्या प्रमाणे अंदाजे रु. 50.00 लक्षाच्या खर्चास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली. व

3) हे कंत्राट रद्द केल्यानंतर फेर निविदा बोलविण्यास वेगळा प्रस्ताव तयार करुन सादर करण्यास व त्यानंतर या कामाकरीता फेरनिविदा बोलविण्याच्या प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन फेरनिविदा कार्यालयाने एकमहीण्याचे आत काढावी व निविदेची संपुर्ण कार्यवाही तीन महीण्यात पुर्ण करण्याच्या अटीवर समितीने त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 66 :– नागपूर शहरातील विविध रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड करुन त्याची एक वर्षा पर्यंत जोपासना करण्याच्या कामाचे कंत्राट श्री.रोहत सुभाष पाटील यांना प्राकलनीय दरापेक्षा 5.50 प्रतिशत कमी दराने रु.29,87,781/– देण्यात आले होते परंतू सदर कंत्राटदारांनी काम अर्धवट सोडून दिल्यामुळे तसेच त्यांना वारंवार कळवून देखील त्यांनी प्रतिसाद न दिल्यामुळे सदर कामाचा कंत्राट रद्द करण्यास तसेच त्यांची अनामत रक्कम जप्त करुन त्यांचे नांव काळया यादीत समाविष्ट करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

श्री असलम खान :– मा.अध्यक्ष महोदय, मेरे प्रभाग मे दो स्कुलो मे मुख्याध्यापक और शिक्षक नही है, दो स्कुल मिलाकर एक गार्ड है, वहां तीन गार्ड रहे तो स्कुल अच्छा रहेगा। उसी तरह से मुख्याध्यापक और शिक्षक रहे तो अच्छा रहेगा। आनेवाली 26 तारीख से स्कुले खुल रही है, इस बात पर हमने जल्द ही ध्यान देना चाहिये। वहां के

मुख्याध्यापक कहते है कि मुझे नगरसेवक से कुछ लेना देना नही है, अगर वह नगरसेवक से वास्ता नही रखते तो हमने स्कुल मे क्या देखना चाहिये।

उप निगम आयुक्त :— मा.अध्यक्ष महोदय, गार्ड का इशु जी.ए.डी. को रेफर करके गार्ड उपलब्ध करवाये जायेगे उसी तरह से 30—06 के बाद मे 1 जुलै से स्कुले रेग्युलर होने के बाद टिचर और मुख्याध्यापक दिये जायेगे।

श्री परिणय फुके :— मा.अध्यक्ष महोदय, एक किलो मिटर के परिसर मे स्कुल के संदर्भ मे क्या किया जारहा है।

उप निगम आयुक्त :— मा.अध्यक्ष महोदय, एक किलो मिटर परिसर मे स्कुल के संदर्भ मे म.न.पा. को सर्टीफाईड करना है, इस काम के लिये अपने शाला निरीक्षक, सर्वशिक्षा अभियान के कर्मचारी अगर ऐसी ऑपलिकेशन आती है तो वह उन्हे सर्टीफाईड करेगे।

अध्यक्ष :— मा.सदस्य की शिकायत यह है कि स्कुल मे जाने के बाद मुख्याध्यापक ने उनसे कहा कि नगरसेवको का स्कुल से कोई लेना देना नही है।

उप निगम आयुक्त :— मा.अध्यक्ष महोदय, यह प्रशासन के इंस्ट्रक्शन नही है।

श्री फुके :— मा.अध्यक्ष महोदय, स्कुलो के संदर्भ मे जी.आर. आया था, जिसमे मा.सदस्य पहले अध्यक्ष रहते थे, स्थायी समिती के मार्फत इस संदर्भ मे लेटर हमने भेजना चाहिये। रामनगर मे रिटायर्ड मुख्याध्यापक रहते है उनका समावेश स्कुल के पॅनल पर होना चाहिये।

उप निगम आयुक्त :— मा.अध्यक्ष महोदय, जो समिती का अध्यक्ष रहेगा उसका बच्चा उस स्कुल मे पढना चाहिये, ऐसे निर्देश थे, अब शायद उसमे चेंज किया गया है।

अध्यक्ष :— पहले जो जी.आर. निकला था उसमे कहां गया था कि, 11 लोगो की समिती बनेगी, उस समिती मे उस प्रभाग के मा.सदस्य भी रहेगे, प्रायव्हेट स्कुलो मे यह परिपत्रक लागु हुआ था, उसी तरह से स्कुलो के सुधार के लिये शाला समिती या ॲडव्हायझरी समिती बने तो इससे काफी फायदा होसकता है, अगर एन.जी.ओ. का भी इसमे समावेश करे, इस तरह के अच्छे लोग स्कुल मे आगर बैठे तो उनके नैतिक दबाव से स्कुले अच्छी होती है, इस विषय पर हमने ध्यान देना चाहिये।

ठराव क्रमांक 67 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

हस्ता /— हरीष दुबे

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

हस्ता /— दयाशंकर तिवारी

अध्यक्ष
स्थायी समिती,

महानगरपालिका,नागपूर